महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

E-MAIL - sscboardp
Website- www.sscboardpune.in



क्रमांक पुविमं / ओ.2 / खाजगी 11950
पुणे 411005
दिनांक 25 / 11 / 2026

प्रति,
प्राचार्य,
उच्च माध्यमिक शाळा / क.महाविद्यालय,
पुणे / अ.नगर / सोलापूर.

विषय :– सन फेब्रु–मार्च 2027 करिता उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) करीता ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज विभागीय मंडळास ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत.

संदर्भ :–1.या कार्यालयाचे जा.क.पुविमं / माध्य–ओ1,उमा–ओ2 / 7179 दि.04 / 08 / 2026 चे पत्र
2. राज्य मंडळ कार्यालयाचे जा.क.रा.मं. / परीक्षा–3 / 3455 दि.13 / 08 / 2026 चे पत्र
3.या कार्यालयाचे जा.क.पुविमं / ओ2 / 10501 दि. 27 / 10 / 2026 चे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) सन फेब्रु–मार्च 2027 करीता ऑनलाईन खाजगी नावनोंदणी अर्जाद्वारे प्रविष्ठ विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये दिसून येत आहे. सदर विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त झाले असेल तर मंडळ कार्यालयास तात्काळ ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि अद्यापही क.महाविद्यालय स्तरावर न पाठविलेल्या अर्जांची संख्या 513 आणि या कार्यालयास प्राप्त तथापि त्रुटीअभावी अपुर्ण असणा–या प्रस्तावांची त्रुटीपुर्ततेकरिता सद्यस्थितीत क.महाविद्यालय स्तरावर अपुर्ण असलेली संख्या 1453 दिसून येत आहे. विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात आलेल्या प्रस्तावांची त्रुटीपुर्तता करून आणि क. महाविद्यालय लॉगइन वर असलेले मुळ कागदपत्रे प्राप्त विद्यार्थ्यांचे खाजगी नावनोंदणी अर्ज विहित मुदतीत मंडळ कार्यालयास ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात यावी. **सदरचे प्रस्ताव मुदतीत प्राप्त न झाल्यास संदर्भिय पत्र क्र. 2 मध्ये नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांना खाजगी नावनोंदणी प्रमाणपत्राअभावी परीक्षेचे आवेदनपत्र दि. 30 / 11 / 2026 पर्यंत मुदतीत भरता न आल्यास विद्यार्थ्यांच्या होणा–या शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार राहाल.** याची नोंद घ्यावी.

तसेच क. महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये ऑनलाईनरित्या प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रस्ताव हे मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त न झाल्यास व अपुर्ण प्रस्तावांच्या त्रुटीपुर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेल्या आपल्या क. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लेखी किंवा एसएमएस द्वारे कळवून त्यांची नोंद आपल्या कार्यालयातील अभिलेखात जतन करून ठेवण्यात यावी.

सोबत :– विद्यार्थ्यांची क. महाविद्यालय निहाय यादी.

MBRaut
(डॉ मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे